भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदूर्ग

कालावधी (दिनांक ०२.०५.२०२० ते ०६.०५.२०२०)

| अंक ३४/२०२० | दिनांक ०१.०५.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२४/०४/२०२० ते ३०/०४/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानूमान (वैधता ०२/०५/२०२० ते ०६/०५/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/०४ | २५/०४ | २६/०४ | २७/०४ | २८/०४ | २९/०४ | ३०/०४ | दिनांक | ०२/०५ | ०३/०५ | ०४/०५ | ०५/०५ | ०६/०५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ५ | १२ | ३ | ० | ० |
| ३७.० | ३७.० | ३८.० | ३८.० | ३८.० | ३८.० | ३६.५ | कमाल तापमान (अं. से) | ३७ | ३७ | ३७ | ३८ | ३८ |
| २४.० | २५.० | २५.० | २६.० | २७.० | २५.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | २७ | २७ | २६ | २६ | २५ |
| निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | ३ | ३ | ४ | ४ | ७ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | दुपार | | | | | |
| ९२ | ८४ | ८४ | ८४ | ८४ | ८७ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९३ | ९३ | ९२ | ८४ | ७६ |
| ४८ | ४८ | ४५ | ४८ | ४५ | ५२ | ४३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४१ | ४३ | ३५ | ३८ | ३५ |
| १.९ | २.३ | २.१ | २.० | २.३ | २.४ | २.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ५ | ७ | ६ | ७ | ८ |
| स्थिर | स्थिर | उत्तर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | पश्चिमेकडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | दक्षिणे कडे | दक्षिणे कडे | पश्चिमेकडे |
| उत्तरोत्तर ईशान्य | उत्तरोत्तर ईशान्य | उत्तर | उत्तर | उत्तरोत्तर ईशान्य | उत्तरोत्तर ईशान्य | उत्तर | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती: | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमानवाढ संभवत आहे त्याचबरोबर दिनांक २, ३, व ४ मे, २०२० रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान दमट व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे |
|---|---|

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फळविकास ते काढणी | जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंड्याच्या आकाराची फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दूपारी चारच्या नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत.<br>काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनुसार बूरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवून पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये.<br>गेल्या आठवड्यात पाऊस झाला असल्याने वातावरणात दमटपणा आला असून आंबा बागांवर फळमाशीचा प्रादूर्भाव दिसून येत आहे तरी नियंत्रणासाठी विद्यपीठाने विकसित केलेले मिथिल युजिनॉलयुक्त रक्षक सापळे प्रति हेक्टरी चार या प्रमाणात आंबा बागेत लावावेत.<br>आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असून प्रादूर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातून फवारावे.<br>नवीन आंबा लागवडीमध्ये रोपांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे. तसेच रोपांना पाणी देऊन अळ्यांमध्ये पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे. |
| काजु | काढणी | काजुमध्ये काढणीयोग्य बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती ऊन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादूर्भाव आढ्ळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादूर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| भात (रब्बी) | पक्वता ते काढणी | काही ठिकाणी भात पीक हे दाना भरण्याच्या अवस्थेत आहे. भात पिकाला नियमितपणे ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे<br>भाताच्या काही जातींमध्ये भात पीक कापनीच्या अवस्थेत आहे. कापणीपूर्वी ८ ते १० दिवस अगोदर शेतातील पाणी काढून दयावे. तयार झालेल्या वायंगणी भाताची कापणी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वैभव विळ्याच्या साहायाने जमिनीलगत करावी. भात पिकाची कापणी शक्यतो पुढे ढकलावी व करावयाचीच असल्यास पावसाचा अंदाज पाहून करावी त्याचबरोबर कापलेले पीक झाकून ठेवावे. |
| भुईमुग | काढणी | तापमानाबरोबर बाष्पीभवनामधध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकाला पेरणीनंतर १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी भूईमूग पीक पक्व होण्याचच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भूईमूगाची पाने पिवळी होऊन गळू लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळ्वुन नंतर साठवणुक करावी. |
| सूर्यफूल | काढ्णी | काही ठिकाणी सूर्यफूल पीक तयार झालेले आहे. वाळलेली फूले विळ्याने कापून ऊन्हात वाळवावी आणि शक्य असल्यास मशीनच्या सहाय्याने अथवा काठीने दांडूकून दाणे वेगळे करावेत. उफणणी करुन दाणे स्वच्छ करावेत आणि ऊन्हात वाळवून साठवुन ठेवावेत. |
| अननस | फळविकास ते काढ्णी | सध्या अननस फळधारणेच्या अवस्थेत आहे. अननस लागवड केलेल्या चरातील जमिनीवर गवताचे आच्छादन दयावे यामूळे तणांची वाढ कमी होते व ओलावाही टिकून राहतो. अननसाची फळे पूर्ण तयार झाल्यावर फळाच्या खालचे एक व दोन ओळीतील डोळे पीवळे झाल्यावर फळे दांडयासह कापून काढावीत. |
| फळप्रक्रिया | आंबा, कोकम, फणस, करवंद, जांभूळ इ. फळांच्या उपलब्धतेनुसार प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करावेत | |
| माती परिक्षण | पिकांच्या काढणीनंतर पिकांची धसकटे, पालापाचोळा, गवत ईत्यादी शेतामध्ये जाळू नयेत, जाळले असता जमिनीतील पिकांच्या पोषण द्रव्यांचा –हास होतो व जमिनीची सूपीकता कमी होते. जमिनीतील नत्र, स्फूरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमूना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमूना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रK, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दूरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) | |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ सशोधन केद्र, वेगुले व उद्यानविद्या महाविद्यालय, मूळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डा. प्रदिप च. हळदवणकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ | डा. यशवत चू. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ |
|---|---|---|